तातडीच्या प्रसिध्दीसाठी

# विश्व बॅंक

संपर्क: *दिल्लीमध्ये: सुदीप मोजुमदार* (91 11) 2461-7241
smozumder@worldbank.org
*वॉशिंगटनमध्ये* : डेल लॉटेनबॅक ((202) 473-3405
dlautenbach@worldbank.org

## *विश्व बॅंकेने एमयूटीपी वरील स्थगिति उचलली*

नवी दिल्ली, 30 जून, 2006: विश्व बॅंकेने काल एमयूटीपी (मुंबई शहरी वाहतूक प्रकल्प) च्या दोन घटकांसाठी आर्थिक मदतीवरील स्थगिति उचलली.

''बॅंक आणि महाराष्ट्र सरकार गेल्या काही महिन्यांपासून त्या महत्त्वाच्या विषयांना संबोधित करीत आहेत ज्यांनी आर्थिक वितरणास स्थगितिकडे नेले, विशेषतः तक्रार प्रणाली, दुकानदारांचे पुनर्वसन आणि पुनर्वसनानंतरच्या सेवा,'' असे विश्व बॅंकेचे देश निर्देशक, मायकल कार्टर यांनी म्हटले, ''आम्हांला हे सांगण्यात फार आनंद वाटतो आहे की यांपैकी प्रत्येक क्षेत्रात चांगली प्रगति झाली आहे.''

कार्टर यांनी म्हटले की पुढे येणारी कठिण व गुंतागुंतीची आव्हाने जाणून घेणे फार महत्त्वाचे आहेः ''या आव्हानांपर्यन्त पोचण्यासाठी आम्ही एमएमआरडीए (MMRDA) बरोबर भागीदारीत काम करणार आहोत ज्यांमध्ये दुकानदारांचे पुनवर्सन आणि उत्तर-पुनवर्सनाच्या पुढील प्रगतीशी संबंधित आव्हांनांचा समावेश आहे. आम्ही आशा करतो की हा प्रकल्प पुरा करीत असतांना पुनर्वसना बाबत जे धडे आम्ही घेतले त्यांमुळे मुंबईच्या दीर्घकालीन विकासा करीता संरचनेला आकार देण्यास मदत मिळेल.''

मार्च 1, 2006 च्या दिवशी विश्व बॅंकेने निष्पक्ष पुनर्वसन आणि प्रकल्पामुळे प्रभावित लोकांचे पुनर्वसन हे विषय लक्षात घेऊन एमयूटीपीच्या दोन घटकांच्या आर्थिक मदतीवर स्थगिति लावली. हे दोन्ही घटक पुनर्वसनाकडे लक्ष देत होते, त्यासाठी त्यांना 79 मिलियन यूएस डॉलरची इंटरनॅशनल डेव्हलपमेन्ट असोसिएशन क्रेडिट कडून आर्थिक मदत मिळाली आणि इंटरनॅशनल बॅंक फॉर रीकन्स्ट्रक्शन एण्ड रोड डेव्हलपमेन्ट कडून 150 मिलियन यूएस डॉलरची आर्थिक मदत मिळाली.

एमयूटीपी ही एक महत्वाकांक्षी रस्ता व रेलवे नवीनीकरण योजना आहे, ज्यामध्ये मुंबई सारख्या मेगा सिटीच्या वाहतुकीने गच्च भरलेल्या शहरां परिवहनामध्ये सुधारणा आणण्याची निकड/गरज आहे.

*****************

मुंबई शहरी वाहतूक प्रकल्प आणि भारतामध्ये विश्व बॅंकेच्या गतिविधि यां बाबत जास्त माहितीसाठी http://www.worldbank.org.in ला भेट द्या